मुंबई विद्यापीठ

क्र. घ.म./ ९ / २०१३ - २०१४

परिपत्रक :-

संदर्भ - १) विद्यापीठ परिपत्रक क्र. संलग्नता व मान्यता /४४५/२००५ दिनांक २७/१०/२००५.
२) विद्यापीठ परिपत्रक क्र. घ.म./४४६/२००७ दिनांक ०७/११/२००७.
३) विद्यापीठ परिपत्रक क्र. घ.म./१५१/२००८ दिनांक ०४/०४/२००८.
४) विद्यापीठ परिपत्रक क्र. घ.म./पी.आय.वो./२६९/२००८ दिनांक २५/०६/२००८.
५) विद्यापीठ परिपत्रक क्र. घ.म./पी.आय.वो./१०१/२००९ दिनांक २३/०३/२००९.
६) विद्यापीठ परिपत्रक क्र. घ.म./४२/२०१३ दिनांक ३० मार्च, २०१३.

मुंबई विद्यापीठाशी संलग्नित सर्व अनुदानित व विना-अनुदानित महाविद्यालयाचे प्राचार्य व प्राचार्यांमार्फत संस्थाचे सचिव / अध्यक्ष यांना कळविण्यात येते की, विद्यापीठाने वेळोवेळी परिपत्रके निर्गमित करून अपिलिय प्राधिकारी, माहिती अधिकारी व सहाय्यक माहिती अधिकारी यांच्या नेमणूका ताबडतोब करण्यात याव्यात व त्यांच्या नावाचे फलक महाविद्यालयात दर्शनी जागेवर सामान्य नागरिकांना दिसतील अशा ठिकाणी लावण्यात यावेत असे कळविले होते. परंतु अद्यापपर्यंत अनेक महाविद्यालयांनी त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही असे दिसून येत आहे. विद्यापीठस्तरावर संलग्नित महाविद्यालयांच्या बैठकीमध्ये महाविद्यालयात माहिती अधिकारी व अपिलिय प्राधिकारी यांचे फालक लावावेत अशा सूचना देवूनही त्याची पूर्तता करण्यात आलेली नाही.

अपिलिय प्राधिकारी, माहिती अधिकारी व सहाय्यक माहिती अधिकारी यांच्या नेमणूका व त्यानुसार फलक लावणे याबाबतची कार्यवाही महाविद्यालय स्तरावर होत नाही असे राज्य माहिती आयोग, उच्च शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन व सहसंचालक मुंबई विभाग व पनवेल विभाग यांच्या निदर्शनास आलेले आहे. त्यामुळे याद्वारे पुन्हा आपणांस सुचित करण्यात येते की, अपिलिय प्राधिकारी, माहिती अधिकारी व सहाय्यक माहिती अधिकारी यांच्या नेमणूका तात्काळ कराव्यात व त्यांच्या नावाचे फलक महाविद्यालयात दर्शनी ठिकाणी लावावेत. जे महाविद्यालय याप्रमाणे तात्काळ कार्यवाही करणार नाही त्यांच्या विद्यापीठाशी संबंधित असलेल्या सर्व प्रक्रियांवर परिणाम होईल याची नोंद घ्यावी.

विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयांच्या प्राचार्यांना सूचित करण्यात येते की, त्यांनी सदर नेमणूका तात्काळ करून त्याचा अहवाल विद्यापीठास ८ दिवसाच्या आत concolsection@gmail.com या ईमेल आयडीवर पाठवावा जे प्राचार्य अहवाल पाठविणार नाहीत त्याची सर्वस्वी जबाबदारी महाविद्यालयांच्या प्राचार्यांवर राहील व त्यांस कारणे दाखवा नोटीस बजावण्यात येईल याची गांभिर्याने दखल घ्यावी.

आपणांस असेही कळविण्यात येते की, ८ दिवसानंतर विद्यापीठस्तरावर महाविद्यालयांस प्रत्यक्ष भेटी देवून माहिती अधिकारी व अपिलिय प्राधिकारी यांच्या नेमणूका करण्यात आलेल्या आहेत किंवा नाही याची खातरजमा करून तसा अहवाल शासनास सादर करण्यात येईल.

मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :- ९ सप्टेंबर, २०१३

(डॉ. राजपाल हांडे)
संचालक (बीसीयुडी)
मुंबई विद्यापीठ